श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विदयापीठ,
महिला विदयापीठ
चर्चगेट, मुंबई – २०

दिनांक: ३०/४/२०१६

परिपत्रक : 982

**विषय** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका २०१६–१७ मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता उपाययोजना करणे.

मा. महोदय/महोदया,

एस.एन.डी.टी विदयापीठ अंतर्गत येणाऱ्या सर्व संलग्नित महाविदयालयांना सूचित करण्यात येते की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका २०१६–१७ च्या अनुषंघाने निवडणुकांकरिता अधिकाधिक नवीन पात्र मतदारांची नावे नोंदणी करण्याकरिता तसेच मतदार यादया बिनचुक व अद्ययावत करण्याकरिता आणि मतदारमध्ये जागरूकता निर्माण करून मतदानाची टक्केवारी वाढावी याबाबत महाविदयालय स्तरावर करावयाच्या उपाययोजनांचे पत्र क्र. सनिआ/मनपा–२०१६/प.क्र १२/का–५. दिनांक २२/०४/२०१६ राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र यांच्या कार्यालयाकडून विदयापीठास प्राप्त झाले आहे. (पत्र सोबत जोडले आहे)

उपरोक्त विषयी सदर उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करावे व आपल्या महाविदयालयात उपरोक्त कामी नेमणुक केलेल्या नोडल ऑफिसरचा तपशील व केलेल्या उपाययोजनांचा अहवाल विदयापीठास पाठवावा.

आपली विश्वासु,

(डॉ. मधुरा केसरकर)
संचालक
(महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळ)

प्राचार्य/ संचालक
सर्व संलग्नित महाविदयालये

D/pallavi 2014-15/Affiliation (pallavi)/Letter/Marathi Letter

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र. १२/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२/०४/२०१६

प्रति,
मा. कुलगुरु,
१. मुंबई विद्यापीठ, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई
२. श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
३. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, जिल्हा - पुणे
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, जि.औरंगाबाद
५. स्वामी रामानंद तिर्थ, मराठवाडा विद्यापीठ, जि. नांदेड
६. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, जि. नागपूर
७. संत गाडगे बाबा विद्यापीठ, जि. अमरावती
८. शिवाजी विद्यापीठ, जि. कोल्हापूर
९. सोलापूर विद्यापीठ, जि. सोलापूर
१०. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जि. जळगाव
११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, जि. रायगड
१२. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी
१३. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषीनगर, जि.अकोला
१४. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर
१५. मराठवाडा कृषी विद्यापीठ, जि. परभणी
१६. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, जि. नागपूर
१७. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, जि. नाशिक

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका २०१६-१७
मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता उपाययोजना करणे...
संदर्भ:- मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी दिनांक १६/३/२०१६ रोजी घेतलेली बैठक.

महोदय,

ऑक्टोबर-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीमध्ये १० महानगरपालिका, १९५ नगर परिषदा/नगर पंचायती, २६ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणा-या २९६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक

निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांकरिता अधिकाधिक नवीन पात्र मतदारांनी त्यांच्या नावाची नोंदणी करण्याकरिता तसेच मतदार याद्या बिनचूक व अद्ययावत कराव्यात आणि मतदारांमध्ये जागरुकता निर्माण करून मतदानाची टक्केवारी वाढावी या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयुक्तांनी दिनांक १६/३/२०१६ रोजी उपरोक्त विद्यापीठांच्या कुलगुरु/प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. या बैठकीमध्ये पुढील उपाययोजना करण्याचे निश्चित करण्यात आले :-

(i) भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निदेशानुसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये मतदार नोंदणीकरिता नोडल ऑफीसरची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानुसार अशी नेमणूक करण्यात आली आहे याची खात्री करावी.

(ii) सन २०१६-१७ मध्ये राबविण्यात येणाऱ्या मतदार नोंदणी कार्यक्रमादरम्यान मतदार नोंदणी / दुरुस्तीचे अर्ज महाविद्यालयांमध्ये स्विकारण्याकरिता संबंधित उपजिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून व्यवस्था करावी.

(iii) मतदार नोंदणी केंद्र स्थापन केल्याबाबत योग्य ते फलक, बॅनर परिसरात लावण्यात यावेत जेणेकरुन नजिकच्या मतदारांना या सुविधेचा फायदा घेता येईल.

(iv) प्राप्त होणारे अर्ज विहित कालावधीत संबंधित उपजिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे पोहोचवावेत.

(v) जी काही लेखनसामग्री (उदा. ॲडमिशन फॉर्मस्, ब्रोशर्स, प्रवेश पत्रिका, निरनिराळे फॉर्मस्, माहिती पुस्तिका, पाठ्यपुस्तके, नोट बुक, इत्यादी) छापली जाते त्यामध्ये शेवटच्या पानावर ठळकपणे दिसेल अशा रितीने मतदार नोंदणीसाठी तसेच मतदान करण्यासाठी आवाहन करणारा मजकूर छापण्यात यावा.

(vi) प्रत्येक संस्थेने त्यांच्या वेबसाईटच्या पहिल्या पानावर मतदार जागृतीबाबतचा मजकूर फ्लॅश करावा.

(vii) त्यांच्याकडे काम करणाऱ्या प्राध्यापकांनी वर्तमानपत्रामध्ये मतदार जागृतीबाबत लेख प्रकाशित करावेत.

(viii) टिव्ही चॅनेल्स, रेडिओवर Debates आयोजित करावेत.

(ix) संस्थेच्या परिसरात असलेल्या गृहनिर्माण संस्था दत्तक घेऊन प्रत्येक गृहनिर्माण संस्थेकरिता २० ते ३० मुले ॲम्बेसेडर म्हणून घ्यावीत व त्यांची स्वयंसेवक (Volunteers) म्हणून नियुक्ती करावी.

(अ) या स्वयंसेवक मुलांनी गृहनिर्माण संस्थांना आवश्यकतेप्रमाणे २ ते ३ वेळा भेटी देऊन ज्या व्यक्तींच्या नावाची नोंदणी झालेली नाही अशा व्यक्तींना नाव नोंदणीसाठी प्रोत्साहित करावे.

(ब) NSS इत्यादी मुलांना गृहनिर्माण संस्थांमधील मतदारांना मतदानासाठी जागरुक केल्याबाबत गुण देणे.

(क) उच्चभ्रू वस्तीमध्ये मतदानाची टक्केवारी कमी असल्याने अशा ठिकाणी मतदान जागृतीसाठी विशेष मोहिम राबविणे.

(ड) ज्या लोकांनी पूर्वीच्या निवडणुकीमध्ये मतदान केले नसेल त्यांना मतदानाचे महत्व सांगून आगामी निवडणुकांमध्ये न चुकता मतदान करण्याचे आवाहन करावे.

(x) त्यांनी "निवडणुकांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घेण्याची आवश्यकता" या विषयावर वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, , पोस्टर्स स्पर्धा, वॉल पेन्टिंग स्पर्धा, इत्यादी आयोजित करावे व चांगले काम करणाऱ्या व्यक्तींना महानगरपालिका किंवा इंडिस्ट्रीच्या मदतीने पारितोषिके द्यावीत.

(xi) वर्ष- २०१६ हे लोकशाही वर्ष म्हणून जाहीर करावे व त्यांच्याकडे होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये (Activities) योग्य ते बॅनर्स लावावेत.